# देगलूर महाविद्यालय देगलूर येथे महिला सन्मान कार्यक्रम संपन्न



देगलूरः(अब्दुल.मुबिन)

महिला दिवस हा सर्वत्र फार मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो व तसेच सर्व क्षेत्रातील महिला वर्गाची प्रेरणा वाढावी अधिक उत्साहाने कार्य करण्याचे बळ मिळावे म्हणून आज यांचे विशेष सत्कार ही केले जातात.या प्रमाणेच देगलूर येथील देगलूर महाविद्यालयात ही जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला सन्मान या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार हे होते या वेळी महाविद्यालयातील प्रा.देबडवार ए.एस, प्रा.शोभा वद्देवार ,तासिका तत्वावरील अध्यापिका श्रीमती मंजुषा आलुरे , राजेश्वरी देवकत्ते, व्हि व्ही जोशी तसेच शिक्षकेतर कर्मचारी श्रीमती संगुबाई वानोळे, श्रीमती रेखाताई ईळेगावकर , तिम्मलवार एस एस यांचा ही पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ प्रकाश कद्रेकर, उपप्राचार्य एन एच गोविंदवार, अधीकक्ष गोविंद जोशी प्रा.वाकडे हणमंत,प्रा सचिन कोंडेकर आदी कर्मचारी, शिक्षक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.महेश कुलकर्णी तर आभार पर्यवेक्षक एस.एन. पाटील यांनी मानले.

18 मार्च 2021 पुण्यनगरी

# प्रा.कोंडेकर यांना पीएच.डी.प्रदान

**देगलूर/ प्रतिनिधी**

देगलूर महाविद्यालयातील गणित विभागप्रमुख



प्रा सचिन कोंडेकर यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे **Some Studies on Quadratic Functional Integral and Differential Equations of Fractional Order** या विषयावर डॉ. बी. डी. करंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. पूर्ण केली आहें. त्यांच्या यशाबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार , उपाध्यक्ष नारायणराव मैलागिरे, सहसचिव सूर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजूकुमार महाजन, डॉ कर्मवीर उनग्रतवार , देवेन्द्र मोतेवार , गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्र अप्पा द्याडे, भगवान पा. भायेगावकर, चंद्रकांत नारलावार, नारायणराव ताडकोले, प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य डॉ. प्रकाश कद्रेकर , उपप्राचार्य निवृती गोविंदवार , पर्यवेक्षक संग्राम पाटील व कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी नळगीरकर यांनी अभिनंदन केले आहे.